MHBU150000462022

## नि.क्र. ५ वरील आदेश

(दि.१२.०१.२०२४)

१. वादीने सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३९ नियम १ आणि २ सह कलम १५१ अंतर्गत तात्पुरत्या मनाई आदेशासाठी दाखल केलेला आहे.

२. मौजे टाकरखेड, ता. देऊळगावराजा, जि. बुलडाणा, येथील गट नं. ९६ क्षेत्रफळ ३ हे. ८२ आर, आकार २.९५ पैसे हिस्सा ० हे. ८० आर, वरील गटातील जमिन ही दाव्याचा विषय असून इथुन पूढे त्यास '**दावा मिळकत**' असे संबोधले जाईल.

३. अर्ज, प्रतिज्ञापत्र, अर्जासोबत दाखल असलेले कादपत्रे पाहिली. वादीतर्फे ॲड भाला यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीविरुध्द प्रकरण एकतर्फा चौकशीसाठी नेमलेले आहे. तरी माझ्या विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होत असून त्याचे कारणमिमांसेसह निष्कर्ष मी नोंदवित आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी हे सिध्द करतो का त्यास प्रथमदर्शनी वाद आहे का ? | नकारार्थी ... |
| २. | वादी हे सिध्द करतो की न्यायाच्या समतोल त्याच्या बाजुने आहे का ? | नकारार्थी... |
| ३. | वादी हे सिध्द करतो की त्याचे अपरिमित असे नुकसान होणार आहे ? | नकारार्थी... |
| ४. | काय आदेश ? | अर्ज निशाणी ५ नामंजुर करण्यात येत आहे |

**का र ण मि मां सा**

४. वादीने अर्जाच्या समर्थनार्थ अभिलेखावर ७/१२ उतारा गट नं. ९६ दि.१२.०१.२०२२ रोजीचा दाखल केलेला आहे

**मुद्दा क्र. १ ते ३ बाबत** :-

५. वरील तिन्हीं मुद्दे हे ऐकमेकांशी संलग्न असून त्यांच्या चर्चेबाबत पूर्नरावृत्ती होऊ नये याबाबत सदर मुद्दे एकत्रात विवंचनेसाठी घेण्यात आलेली आहेत. वादीने दाव्यामध्ये विनंतीद्वारे कायमचा मनाई आदेश प्रतिवादीविरुध्द करण्यात यावा अशी मागणी केलेली आहे. त्याचबरोबर सदर अर्जामध्ये देखिल तात्पुरती मनाई आदेश दाव्याचा अंतिम निकाल होईतोपर्यत मागितलेला आहे. वादीच्या वादकथनांचा विचार करता वादीने दावा मिळकतीबाबत प्रतिबंधात्मक आदेश मिळावा

यासाठी मागणी केली आहे आणि त्यास अनुसरून दाव्यासोबत दावा मिळकतीचा ७/१२ उतारा दाखल केलेला आहेत. दि.०५.०४.२१ रोजी दूपारी १०.३० वाजता वादी व तीची भावजय पूष्पा टेके व रोजंदारीने आणलेली मंगला इंगळे हे शेतात कापूस वेचण्यासाठी गेले असता त्याठिकाणी प्रतिवादी नं. २ मनोहर तातोबा जायभाये हा पळत आला व त्याने दगड घेऊन वादीस दमदाटी केली, जिवे मारण्याची धमकी दिली व शेतात जाण्यापासून रोखले. जर पाय ठेवले तर जिवे मारून टाकू अशा धमक्या देतात. प्रतिवादींकडे जोडजमाव असल्यामुळे वादीला दाव्यातील जमिन वाहीती करणे अशक्य झाले आहे.

६. वादीने शिवीगाळ करू नका असे म्हटल्यावर त्यांनी वादीस दमदाटी केली व शेतात जाण्यापासून रोखले. वादीने पोलीस स्टेशन अंढेरा येथे रिर्पोट दिला असता परंतु त्यानंतरही प्रतिवादीने वादीला शेतात जाण्यास मज्जाव सूरूच ठेवला. त्यामुळे, वादीस शेती वाहती करता आली नाहीतर वादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. वादीस शेतीशिवाय दूसरे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. वादीचे वर शेती पडीक पडल्यामुळे उपासमारीची वेळ येत आहे. १७.०१.२२ रोजी वादीने पोलीस स्टेशन अंढेरा येथे प्रतिवादीविरुध्द तक्रार करण्यास गेले असता पोलीसांनी त्यास कोर्टात जावून मनाई हुकूम आणा असे सांगितले.

७. वस्तुतः वादीने दावा मिळकतीमध्ये ज्यावेळेस दाव्यास कारण घडले म्हणजे १७.०१.२२ अगर ०५.०४.२१ रोजी त्याचे शांततामय कब्जे वहिवाट सूरू आहे हे अभिलेखावर दाखविण्यासाठी म्हणून दावा मिळकतीचे फोटो, लगत कब्जेदारांचे प्रतिज्ञापत्र, तलाठ्याचे कागदपत्र अगर अन्य कोणताही कागदोपत्री पूरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच वादीने भावजय पूष्पा टेके व रोजंदारीने आणलेली मंगला इंगळे या महिलांचे देखिल प्रतिज्ञापत्र दाखल केले नाही. वादीने अभिलेखावर दावा मिळकतीचे फक्त एकच ७/१२ उतारा दाखल केले आहेत. ७/१२ उताऱ्यावरून निव्वळ वादीची मालकी व वहिवाट दावा मिळकतीत आहे असे म्हणता येत नाही कारण ७/१२ उतारा हा महसूली आकारणी वसुल करण्याकरिताचा दस्त आहे. तसेच दावा मिळकतीच्या ७/१२ चे अवलोकन केले असता वादीने इतर सह हिस्सेदारांना पक्षकार केले नाही त्यामुळे देखिल वादीचा दावा फोल ठरतो. सर्वात महत्वाचे म्हणजे वादीने अर्जात नमुद केलेली पोलीस स्टेशनकडील तक्रारी याबाबतची देखिल अभिलेखावर कोणतीही कागदपत्रे अगर दस्त वादीने त्याच्या अर्जाचा बळकटी यावी म्हणून दाखल केलेली नाही. त्यामुळे, वादीने त्याची महत्वपूर्ण जबाबदारी त्यास प्रथमदर्शनी केस आहे काय ही सदर अर्जाच्या अनूषंगीक पार पाडणे अत्यंत आवश्यक आहे. दावा मिळकतीच्या क्षेत्रफळाबाबत वादीने केलेली कथने ही नेमक्या कोणत्या दिशेचे दावा मिळकतीचे क्षेत्र हे वादीच्या वहिवाटी खाली आहे हे देखिल दाव्यामध्ये कोठेही स्पष्ट केले नाही. त्यामुळे, वादीने सद्यस्थीतीला दावा मिळकतीमध्ये त्याचे मालकी, वहिवाट व कब्जा दर्शविणारे खरेदीपत्रे अगर अन्य

महत्वपूर्ण दस्त दाखल केले नाहीत. त्याचबरोबर वादीचे अपरिमित नुकसान काय होणार आहे. यादेखिल बाबी वादीने अर्जात कोठेही स्पष्ट केला नाही. कायद्याचा समतोल देखिल वादीच्या बाजूने आहे किंवा कसे ही देखिल बाब कागदोपत्री शाबीत केलेली नाही. त्यामुळे, निव्वळ तिन्हींही दावा मिळकतीचे ७/१२ उतारे दाखल करून वादी म्हणतात त्याप्रमाणे दावा मिळकतीत त्यांचा कब्जा आहे असे सकृतदर्शनी सद्यस्थीतीला म्हणता येत नाही.

८. वादीने काही मुलभुत गोष्टी न्यायालयापासून लपवून ठेवल्या आहे असेही अर्जाच्या स्वरूपावरून वाटते. कारण वादीने दावा मिळकतीची मालकी जाहीर होऊन मिळावे याबाबत दावा आणलेला नाही. त्यामुळे, वादी अर्जात मागणी करतात त्याप्रमाणे अंतरिम मनाई हुकूमाचा आदेश अभिलेखावरील कागदपत्रावरून सद्यस्थीतीला देता येत नाही. त्यामुळे, नैसर्गिक न्यायतत्वानूसार आणि दि.प्र.सं. आदेश ३९ नियम १ व २ चे आवश्यक घटक वादीने शाबीत केले नसल्याने **मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवीत आहे.**

**<u>मुद्दा क्र. ४ बाबत</u>** :–

९. ज्याअर्थी मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष हे नकारार्थी असे नोंदविले आहेत. वादीने त्यास अर्जाची विनंती मान्य करण्याइतपत अभिलेखावर कागदपत्रे दाखल केलेली नसल्याने व त्याचा अर्ज कायद्याच्या कक्षेत येत नसल्याने मी **मुद्दा क्र. ४ च्या दाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे** :–

**आदेश**

अर्ज निशाणी ५ नामंजुर करण्यात येत आहे.

स्वा/–

दि.१२.०१.२०२४.

**शैलेश यु. कंठे**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**देऊळगावराजा.**

रुपेश अशोक दांडगे,
लघुलेखक.